# शिस्त आणि त्याचे कायदेशीर परिणाम समजून घेणे

बाल संरक्षण कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शिका



## ही मार्गदर्शिका का महत्वाची आहे ?

सामाजिक कार्यकर्ते बालकांच्या जीवनात एक विशिष्ट विश्वास व जबाबदारीची भूमिका पार पाडतात. एप्रिल २०२५ मध्ये प्रेरणा संस्थेने '**सकारात्मक शिस्ती**' या विषयावर आपली पहिली कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेचा उद्देश म्हणजे, बालकांच्या भावनिक आरोग्याला चालना देणारे, त्यांच्यात लवचिकता (resilience) निर्माण करणारे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणारे **अहिंसात्मक व आदरपूर्वक मार्गदर्शनाचे/शिस्तीचे उपाय** समजून घेणे.

ही माहितीपत्रिका त्या कार्यशाळेतून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून **व्यावसायिक मार्गदर्शन व कायदेशीर स्पष्टता** प्रदान करण्याचा प्रयत्न करते — विशेषतः **अठरा वर्षांखालील बालकांसोबत दररोज संपर्कात येणाऱ्या सर्व कार्यकर्ते** जसे की शिक्षक, पालकवात्सल कर्मचारी (caregivers), पर्यवेक्षक, आणि संस्था चालवणारे कर्मचारी इत्यादि.

मूलतः, **सकारात्मक शिस्त** म्हणजे बालकांना शिक्षा न करता **शिकवणे आणि पाठबळ देणे** हा दृष्टिकोन आहे. जेव्हा शिक्षक किंवा सामाजिक कार्यकर्ते कठोर शिक्षेऐवजी **संवाद, स्वतः आदर्श ठरणे, सुसंगत नियम**, आणि **सुधारणात्मक पद्धती** वापरतात, तेव्हा ते प्रत्येक बालकाच्या **स्वाभिमानाचा आदर करतात** आणि त्यांच्या **मूलभूत हक्कांचे रक्षण** करतात. याच्या विपरीत, कठोर किंवा हिंसक शिक्षेमुळे **स्वतःबद्दलचा आदर कमी होणे, भीती व चिंता निर्माण होणे**, आणि बालकांना **शिकण्याची व वाढण्याची क्षमता कमी होणे** यांसारखे **दीर्घकालीन दुष्परिणाम** होऊ शकतात. ही मार्गदर्शिका **अत्याचार रोखण्याची तातडीची गरज, जनजागृती वाढवणे,** आणि **कोणत्याही बालकांच्या अधिकाराचे उल्लंघनाबाबत विलंब न करता नोंद** करण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

ही मार्गदर्शिका **अठरा वर्षांखालील बालकांसोबत काम करणाऱ्या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांसाठी** तयार करण्यात आलेली आहे — मग तुम्ही **अभ्यासवर्गाचे शिक्षक, पाळणाघर, दिवस निवारे (डे-केअर) किंवा ड्रॉप-इन सेंटरमधील देखभाल करणारे कर्मचारी, पूर्व-प्राथमिक शिक्षक किंवा सहाय्यक, रात्र निवारा (नाईट-केअर) सेंटर मध्ये कार्यरत कर्मचारी,** किंवा **बालकेंद्रित संस्थेमधील पर्यवेक्षक** असलात, तरीही ही माहिती तुमच्यासाठी उपयुक्त आहे.

ही महितीपत्रिका हे अधोरेखित करते की, भारताची कायदेशीर रचना- संविधानातील हमी, **शिक्षणाचा अधिकार कायदा** (Right to Education Act), **बाल न्याय कायदा** (Juvenile Justice Act) आणि NCPCR सारख्या संस्थाच्या मार्गदर्शक तत्व हे **अहिंसात्मक, सन्मान राखणारे आणि शिक्षणात्मक वर्तन व्यवस्थापनाचे दृष्टिकोन** मान्य करतात, जे प्रत्येक बालकाच्या **संरक्षण, विकास आणि आत्मसन्मानाच्या अधिकाराला दृढ करतात.**

**ही मार्गदर्शिका दोन भागांमध्ये विभागलेली आहे:**

- पहिला भाग "शिस्त" आणि "शिक्षा" यातील फरक समजावून सांगतो, ज्यामध्ये संकल्पनात्मक आणि कायदेशीर दृष्टीकोनातून या दोन गोष्टींची तुलना केली आहे आणि भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय कायद्याशी जुळणाऱ्या रचनात्मक धोरणांचे उदाहरण दिले आहे.
- दुसऱ्या भागात संवाद तंत्र, सुधारात्मक गट चर्चा (restorative circles), 'टाइम-इन' पद्धत आणि अशा अनेक ठोस उपाययोजना दिल्या आहेत, ज्या शैक्षणिक आणि बाल संवर्धन/ काळजी केंद्रांसाठी विशेषतः अनुकूल आहेत.

ह्या संपूर्ण मार्गदर्शीकेत संस्थात्मक नियमांचे पालन, अहवाल देण्याच्या प्रक्रिया, आणि महत्त्वाच्या कायदे व नियमांबाबत माहिती देणारे मार्गदर्शक निर्देशही दिले आहेत.

आम्हाला आशा आहे की, ही मार्गदर्शिका तुमच्यासाठी असे सुरक्षित आणि पोषक वातावरण तयार करण्यात मदत करेल, ज्यात प्रत्येक बालकाला शिकण्याची, वाढण्याची आणि समृद्ध होण्याची संधी मिळेल.

# भारतीय कायद्याच्या दृष्टीने शिक्षा आणि शिस्त यांना समजणे

भारतीय कायद्याच्या संदर्भात, विशेषतः बालकांच्या हक्कांशी संबंधित, शिस्त आणि शिक्षा यांचा वेगळा अर्थ आहे. आणि त्याचे महत्त्वाचे कायदेशीर व नैतिक परिणाम होतात.

## Definition

### शिस्त

शिस्त म्हणजे पालक, इतर काळजी घेणारे किंवा शिक्षक यांच्या मार्फत बालकांना योग्य वर्तन शिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रचनात्मक पद्धती. यामध्ये शिकण्यावर, परिणाम समजून घेण्यावर आणि आत्मसंयम विकसित करण्यावर भर दिला जातो.

### शिक्षा

शिक्षा म्हणजे बालकांच्या चुकांबद्दल किंवा गैरवर्तनाबद्दल त्यांना वेदना, त्रास किंवा दंड देणे होय. ही शिक्षा शारीरिक, भावनिक किंवा मानसिक स्वरूपाची असू शकते.

## कायदेशीर दृष्टिकोण

### शिस्त

- भारतीय कायदे सकारात्मक शिस्तीला समर्थन देतात , ज्यामध्ये समजावणे, मर्यादा ठरवणे, आदर्श दाखवणे आणि चांगल्या वर्तनाला प्रोत्साहन देणे यासारख्या पद्धतींचा समावेश होतो.
- हे भारताने स्वाक्षरी केलेल्या संयुक्त राष्ट्र बाल हक्क संहितेशी (UNCRC) सुसंगत आहे.
- शिस्त ही अहिंसात्मक असते आणि बालकाचा सन्मानपूर्ण आदर करते

### शिक्षा

- भारतीय कायद्यानुसार, शारीरिक शिक्षा शाळांमध्ये प्रतिबंधित आहे (शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९, कलम १७).
- बालकांना इजा पोहोचवणारी शिक्षा ही बाल संरक्षण कायद्यांचे उल्लंघन ठरते, जसे की:
- बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५
- भारतीय न्याय संहिता (Bhartiya Nyaya Sanhita), कलम ११५ (२) (जाणीवपूर्वक इजा करणे)
    - घरामध्ये सुद्धा, जर शिक्षा निर्दयी किंवा अपमानास्पद स्वरूपाची असेल, तर ती बाल कल्याण प्रणालींनुसार अत्याचार मानली जाऊ शकते.

## उदाहरण

### शिस्त

बालकाला त्यांच्या वर्तनात काय चूक आहे हे समजावून सांगणे आणि पुढच्या वेळी चांगले पर्याय निवडण्यासाठी प्रोत्साहित करणे.

### शिक्षा

शिक्षेच्या स्वरूपात मारणे, चापट मारणे, अपमान करणे किंवा खोलीत बंद करणे.

## आंतरराष्ट्रीय कायद्यांतील कायदेशीर पाया

### संयुक्त राष्ट्र बाल हक्क संहिता (UNCRC)

जरी संयुक्त राष्ट्र बालहक्क संहिता (UN Convention on the Rights of the Child) प्रत्येक कलमामध्ये स्पष्टपणे “शारीरिक शिक्षा” हा शब्द वापरत नाही, तरीही त्यातील अनेक मूलभूत तरतुदींचा अर्थ संयुक्त राष्ट्र बालहक्क समितीने असा लावला आहे की, सदस्य राष्ट्रांनी बालकांना सर्व प्रकारच्या शारीरिक हिंसेपासून संरक्षण द्यावे.

### शारीरिक शिक्षा आणि शारीरिक हिंसेशी संबंधित मूलभूत कलमे

**कलम १९ – सर्व प्रकारच्या हिंसेपासून संरक्षण**

सदस्य राष्ट्रांनी बालकांना सर्व प्रकारच्या शारीरिक किंवा मानसिक हिंसा, इजा किंवा अत्याचार, दुर्लक्ष किंवा हलगर्जीपणा, वाईट वागणूक किंवा शोषणापासून संरक्षण देण्यासाठी योग्य कायदेशीर, प्रशासकीय, सामाजिक आणि शैक्षणिक उपाययोजना कराव्यात.

हेच ते मुख्य कलम आहे ज्याच्या आधारावर शारीरिक शिक्षेवर बंदी घालण्याची मागणी केली जाते.

संयुक्त राष्ट्र बालहक्क समितीने स्पष्टपणे म्हटले आहे की, "शारीरिक शिक्षा कोणत्याही स्वरूपात, अगदी सौम्य असली तरीही, कलम *19* अंतर्गत स्वीकारार्ह नाही.

**कलम २८ (२) – शाळेतील शिस्त ही बालकांच्या सन्मानाची पायमल्ली न करता राबवली पाहिजे**

सदस्य राष्ट्रांनी योग्य त्या सर्व उपाययोजना कराव्यात, जेणेकरून शाळेत शिस्त ही बालकांच्या हक्काचे उल्लंघन करणारी नसावी.

याचा अर्थ असा होतो की, शाळा किंवा संस्थांमध्ये शारीरिक शिक्षा दिली जाऊ नये.

**कलम ३७ (a) – छळ किंवा क्रूर, अमानवी व अपमानास्पद वागणुकीपासून मुक्तता**

कोणत्याही बालकाला छळ, किंवा इतर क्रूर, अमानवी अथवा अपमानास्पद वागणूक किंवा शिक्षा दिली जाणार नाही...

शारीरिक शिक्षा ही अनेक वेळा अपमानास्पद किंवा क्रूर समजली जाते आणि अनेक अर्थानुसार हे कलम त्या प्रकारच्या शिक्षेसाठी लागू होते.

**कलम ६ – जीवन, अस्तित्व आणि विकासाचा हक्क**

या कलमानुसार शारीरिक शिक्षा, विशेषतः ती गंभीर स्वरूपाची असल्यास, **बालकाच्या जीवन, अस्तित्व किंवा विकासासाठी धोका निर्माण करू शकते.**

**कलम ३ (१ ) – बालकांच्या सर्वोत्तम हितासाठी**

बालकांसंबंधित सर्व कृतींमध्ये... त्यांचे सर्वोत्तम हिताला प्रमुख्य देणे.

शारीरिक शिक्षा ही बालकांच्या सर्वोत्तम हितास हानिकारक आहे.

### संयुक्त राष्ट्र बालहक्क समितीची व्याख्या

**सामान्य टिप्पणी क्रमांक ८ (२००६): बालकाला शारीरिक शिक्षा आणि इतर क्रूर किंवा अपमानास्पद शिक्षांपासून संरक्षण मिळण्याचा हक्क.** या टिप्पणीमध्ये स्पष्ट सांगितले आहे की, **सर्व प्रकारच्या शारीरिक शिक्षेला – कोणत्याही ठिकाणी (घर, शाळा, पर्यायी देखरेख व्यवस्था, न्याय प्रणाली) – प्रतिबंधित केले पाहिजे.** समितीने म्हटले आहे की, **शारीरिक शिक्षा ही बालहक्क संहितेशी विसंगत आहे.**

## भारतीय शिक्षण संदर्भातील सकारात्मक शिस्त पद्धती:



### सुरक्षित आणि सर्वसमावेशक वातावरण निर्माण करणे:

- शाळांना प्रोत्साहित केले जाते की, त्या अशी अनुकूल, समावेशक आणि भितीमुक्त जागा तयार करतील जिथे बालकांना सन्मान आणि महत्व दिले जाईल.
- शिक्षकांना भेदभाव टाळण्याचे प्रशिक्षण आणि बालकांच्या भावनिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यावर भर दिला जाईल.

### संवाद आणि स्पष्टीकरणाचा वापर



- ओरडण्या ऐवजी,शिक्षक बालकांना हे वर्तन योग्य का नाही याची समज निर्माण करावी.
- हे बालकांना त्यांच्या कृतींवर विचार करण्यास आणि चांगले निर्णय घेण्यास प्रोत्साहित करेल.



### स्पष्ट नियम आणि अपेक्षा ठरवणे

- शाळेतील नियम स्पष्टपणे सांगितल्याने बालकांना मर्यादा समजायला मदत होईल.
- हे नियम सातत्याने आणि सर्वांना समान पद्धतीने लागू केले जाणे गरजेचे आहे.

### ओळख आणि प्रोत्साहन



- चांगल्या वर्तनासाठी सकारात्मक प्रोत्साहन (प्रशंसा, बक्षिसे, प्रमाणपत्रे) विद्यार्थ्यांना प्रेरित करते.
- हे फक्त चुका दाखवण्याऐवजी बालकाने काय योग्य केले आहे यावर भर द्यावा.



### टाइम-इन (टाइम-आउटच्या ऐवजी)

बालकाला वेगळं किंवा दूर ठेवण्याऐवजी शिक्षक किंवा प्रौढ व्यक्तीकडे मदतीसाठी आणि विचार करण्यासाठी घेऊन जाणे.



### सुधारात्मक पद्धती

बालकाला वाद सोडवण्यात, परिणाम समजून घेण्यात आणि सुधारणा करण्यात सहभागी केले जाणे गरजेचे आहे. हे जबाबदारीची जाणीव आणि सहानुभूती वाढवण्यास प्रोत्साहित करते.



### निर्णयामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग :

विद्यार्थ्यांना वर्गातील नियम तयार करण्यात किंवा समस्या सोडवण्यात सहभागी केल्याने त्यांच्यात जबाबदारीची जाणीव आणि आपलेपणाची भावना निर्माण होते.



### मार्गदर्शन आणि समुपदेशन:

शाळांना प्रशिक्षित समुपदेशक किंवा मार्गदर्शक नेमण्यास प्रोत्साहन द्यावे, जे विद्यार्थ्यांना भावनांचे व्यवस्थापन, वर्तन आणि इतर विद्यार्थ्यांनसोबतचे संबंध समजून घेण्यात मदत करतील.

## बालकांसाठी संविधानात्मक तरतुदी :

### कलम २१ – जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क

"कोणालाही, कायद्याने ठरवलेल्या प्रक्रियेव्यतिरिक्त, त्याच्या जगण्याच्या किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित करता येणार नाही."

- जगण्याचा हक्क म्हणजे सन्मानाने जगण्याचा हक्क होय.
- सर्वोच्च न्यायालयाने या कलमाचे अर्थ लावताना, हिंसा, अत्याचार आणि अपमानास्पद वागणूक (शारीरिक शिक्षा यासह) पासून मुक्तता या गोष्टी यामध्ये समाविष्ट असल्याचे स्पष्ट केले आहे.

### कलम २१A – शिक्षणाचा हक्क

"राज्याने ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून द्यावे..."

- या कलमाचा अर्थ असा आहे की, बालकांना **सुरक्षित व अहिंसक शिक्षणाचे वातावरण मिळावे**, ज्यामध्ये शारीरिक शिक्षेला थारा नसतो.
- बालकांना **मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा अधिकार कायदा, २००९** (RTE Act)' यामुळे या अर्थाला अधिक बळ मिळते – शाळांमध्ये शारीरिक शिक्षेला स्पष्टपणे बंदी आहे.

### कलम १५(३) – बालकांसाठी विशेष तरतुदी

या कलमातील कोणतीही अट, राज्याला बालकांसाठी विशेष तरतुदी करण्यास अडथळा ठरू शकत नाही.

यामुळे **शारीरिक शिक्षेवर बंदी आणणारे कायदे आणि धोरणे तयार करण्याचा अधिकार राज्याला मिळतो, तसेच बालकांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करता येतात.**

### कलम ३९(f) – राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

राज्याने हे लक्षात घेतले पाहिजे की, बालकांना त्यांच्या सर्वांगीण व आरोग्यपूर्ण विकासासाठी आवश्यक संधी आणि सुविधा मिळाल्या पाहिजेत, आणि स्वातंत्र्य व सन्मानाच्या वातावरणात वाढ झाली पाहिजे.

यामुळे अहिंसक संगोपन आणि अपमानास्पद वागणुकीपासून संरक्षण याचे महत्त्व अधोरेखित होते.

### कलम ३९(e) – राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

राज्याच्या धोरणामध्ये हे लक्षात घेतले पाहिजे की, बालकांचा गैरवापर होऊ नये आणि त्यांना त्यांच्या वय किंवा शरीराला न झेपणाऱ्या कामासाठी जबरदस्तीने सामील केले जाऊ नये.

या कलमाचा अर्थ असा होतो की बालकांना सर्व प्रकारच्या अत्याचारांपासून, विशेषतः शारीरिक हिंसेपासून, संरक्षण देणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

### कलम ५१A(k) – पालकांची किंवा बालकांचा सांभाळ करणारी व्यक्ति यांची जबाबदारी आहे की, त्यांनी बालकांना शिक्षण व नैतिक विकासासाठी संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (RTE Act)

### कलम १७: शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळास बंदी.

- बाल प्रेमी, भीतीमुक्त शिक्षणाचे वातावरण निर्माण करणे.
- सर्व शाळांना लागू – सरकारी आणि खाजगी.
- शाळेच्या अधिकाऱ्यांद्वारे कारवाई होऊ शकते, किंवा शिक्षण अधिकारी, SCPCR/NCPCR अथवा पोलिसांकडे तक्रार करता येते.
- बालकांना सुरक्षित आणि सन्मानजनक शिक्षणाचे वातावरण मिळावे, याची हमी देणे.
- पालक किंवा कोणीही स्थानिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रार देऊ शकतात.
- **शिक्षणाचा हक्क मार्गदर्शक सूचना २०२१ मार्फत** शाळांनी सुरक्षा आराखडे तयार करावेत आणि शाळा व्यवस्थापन समिती (SMC) चा समावेश करावा, असे सुचवले आहे.

## बाल न्याय (बालकांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ (JJ Act)

बाल न्याय अधिनियमाच्या कलम २(२४) नुसार, शारीरिक शिक्षेची व्याख्या अशी केली आहे: "कोणत्याही व्यक्तीने एखाद्या बालकाला जाणीवपूर्वक वेदना देणारी शारीरिक शिक्षा देणे – ही शिक्षा चुकीच्या बदल्यासाठी किंवा त्या मुलाला शिस्त लावण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी दिली जाते – याला शारीरिक शिक्षा असे म्हणतात."

कलम ७५ नुसार कोणीही व्यक्ती, जिच्याकडे बालकाची जबाबदारी आहे, जर त्याला मारते, सोडून देते, त्रास देते, दुर्लक्ष करते किंवा कोणालातरी त्याच्या सोबत असे वागवण्यास प्रवृत्त करते, ज्यामुळे त्याला शारीरिक किंवा मानसिक त्रास होतो, तर तो गुन्हा आहे.

  - **शिक्षा:** ३ वर्षांपर्यंत कारावास आणि दंड.
- **कलम ८२:** बालकांची काळजी घेणाऱ्या व्यक्ती (पालक, पालक-पर्यायी सेवा, CCI कर्मचारी, आश्रयगृह, NGO कर्मचारी) यांना शारीरिक शिक्षा देण्यास बंदी.
  - **शिक्षा:** ६ महिनेपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही (पुनरावृत्ती झाल्यास अधिक कठोर शिक्षा).

## नियम ८९ – महाराष्ट्र राज्य बाल न्याय नियम, २०१६ -संस्थात्मक जबाबदारी:

- शारीरिक शिक्षा, एकाकी कैद (solitary confinement), अपमानजनक वागणूक यावर बंदी.
- **बाल काळजी/संवर्धन संस्थांमध्ये (CCIs)** शारीरिक किंवा मानसिक शिक्षेवर बंदी (उदा. शेल्टर होम्स).
- **बाल प्रेमी पद्धतीने वागणूक नियंत्रणासाठी लिखित नियम आवश्यक** – बालकेंद्री, अहिंसक पद्धती वापरणे.
- चुकीच्या वागणुकीसाठी **अंतर्गत तक्रार निवारण प्रणाली असावी**.
- कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण आवश्यक.
- सर्व घटना आणि कारवाईंचे **नोंदवही ठेवणे बंधनकारक**.
- नियम न पाळल्यास **कायदेशीर कारवाई होऊ शकते**.

## भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३:

### कलम ११९ – बालकांवर हल्ला किंवा गुन्हेगारी उद्देशाने बलाचा वापर करणे

एखाद्या व्यक्तिकडून हल्ला,गुन्हेगारी बल/ताकद वापरुन किंवा शीलभंग करण्यात आला तर त्याला शिक्षा होऊ शकते, विशेषतः जर आशा प्रकरणात पीडित बालक असेल तर.

### कलम १२५(२) – जाणीवपूर्वक गंभीर इजा करणे

ज्या कृतींमुळे गंभीर जखम किंवा दीर्घकालीन नुकसान होऊ शकते असे कृत्य बालकावर केले गेले तर हे अधिक गंभीर समजले जाते.

### कलम १३८ – बालकाला बेकायदेशीर बंदी करणे

एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीरपणे अडवणे किंवा कैद केल्यास तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते आणि जर ती व्यक्ती बालक असेल तर ह्या शिक्षेत वाढ होऊ शकते.

## बाल हक्क संरक्षण राष्ट्रीय आयोगाने २०२१ मध्ये तयार केलेले शाळांमधील बाल सुरक्षितता आणि सुरक्षा संदर्भातील मार्गदर्शक पुस्तिका

### शारीरिक शिक्षा म्हणजे काय?

- शारीरिक शिक्षा म्हणजे कोणतीही शारीरिक शिक्षा, मौखिक त्रास, मानसिक छळ किंवा भेदभावपूर्ण वागणूक जी बालकांच्या प्रतिष्ठेला नुकसान पोहोचवते.
- उदाहरणार्थ: काना खाली मारणे , चिमटे घेणे, छडीने मारणे, दीर्घकाळ उभे राहण्यास किंवा गुडघे टेकण्यास भाग पाडणे, नावाने हसणे, उपहास करणे, सार्वजनिक रित्या लाज वाटेल असे कृत्य करणे.

### मूलभूत तत्त्वे:

- बालकांच्या प्रतिष्ठा आणि वैयक्तिकत्वाचा सन्मान करणे.
- वागणूक सुधारण्यासाठी बालप्रेमी, वयानुरूप पद्धतींचा वापर करणे.
- स्तुती आणि प्रोत्साहनासारख्या सकारात्मक शिस्तीच्या उपाययोजनांचा अवलंब करणे.

### संस्थात्मक जबाबदाऱ्या:

- शाळांनी शारीरिक शिक्षा निरीक्षण कक्ष स्थापन करणे आवश्यक आहे.
- तक्रार नोंदणी वही/ नोंदणी पुस्तिका ठेवणे.
- स्पष्ट धोरणे तयार करणे आणि सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेणे.
- शिक्षक व कर्मचाऱ्यांना हिंसारहित शिस्तीबाबत नियमित प्रशिक्षण देणे.

### बालकांच्या सहभागासाठी:

बाल समित्या किंवा मंचाद्वारे बालकांच्या सहभागास प्रोत्साहन देणे.

### तक्रार नोंदणी व्यवस्था:

- बालक व पालक यांना शिक्षेच्या घटनांची तक्रार करण्यासाठी स्पष्ट व्यवस्था उपलब्ध करणून देणे.
- गंभीर प्रकरणे शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण विभाग आणि गरज असल्यास बाल संरक्षण प्रणालीकडे त्वरित पाठवावीत.

### राष्ट्रीय बाल धोरण (२०१३)

- हिंसारहित पालनपोषण आणि बालकांच्या मानसिक व भावनिक कल्याणाचा प्रसार यावर भर देते.
- पालकत्व आणि शिक्षणात सकारात्मक शिस्तीला प्रोत्साहन देते.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०

- रचनात्मक, विद्यार्थी केंद्री शिक्षण पद्धतीला प्रोत्साहन देते.
- जीवन कौशल्ये, भावनिक सुरक्षा आणि शिक्षक-विद्यार्थी सहानुभूतीपूर्ण संबंध यावर भर देते.

### राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण, २०१४

- शाळा आणि संस्थांमध्ये मानसिक आरोग्याच्या काळजीसाठी आग्रह धरते.
- आरोग्यदायी विकासासाठी हिंसा रहित वातावरणाचे महत्त्व ओळखते.

### राष्ट्रीय प्रारंभिक बाल काळजी आणि शिक्षण (ECCE) धोरण

- लहान बालकांच्या सकारात्मक सहभागास प्रोत्साहन देते व आंगणवाडी/शाळा पूर्व शिक्षकांचे हिंसारहित शिस्तीसाठी प्रशिक्षण करण्याची शिफारस करते.

**बाल हक्क संरक्षण राष्ट्रीय आयोगाचे (NCPCR) शाळांमध्ये शारीरिक शिक्षेच्या निर्मूलनासाठी मार्गदर्शक तत्त्वे**

"शारीरिक शिक्षा म्हणजे छळ होय आणि ही बालकांच्या स्वातंत्र्य व प्रतिष्ठेला बाधक आहे. यामुळे बालकांच्या शिक्षण हक्कातही अडथळा येतो कारण शारीरिक शिक्षेच्या भीतीमुळे बालके शाळेत येणे टाळण्याची किंवा पूर्णपणे सोडण्याची शक्यता वाढते."

## वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ)

### आई-वडिलांना शारीरिक शिक्षेसाठी शिक्षा होऊ शकते का?

**होय.** भारतात आई-वडील व नातेवाईक जर बालकांवर शारीरिक किंवा मानसिक अत्याचार करत असतील तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

- कोणत्या कायद्या अंतर्गत :
  - **बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) कायदा, २०१५** – कलम ७५ : बालकाची जबाबदारी असलेल्या कोणत्याही व्यक्तीस लागू. शारीरिक अत्याचार, दुर्लक्ष व क्रूरतेवर शिक्षा.
  - **भारतीय न्याय संहिता** (BNS): शरीरास इजा किंवा गंभीर इजा झाल्यास लागू होणारी दंडात्मक तरतूद सर्व व्यक्तींना लागू होते, यात कुटुंबीयांचा समावेश आहे.
  - **भारतीय संविधान:** कलम २१ आणि ३९ (e)(f) नुसार, बालकाचा सन्मान सुनिश्चित करण्यात आला आहे तसेच संरक्षण आणि शोषणापासून मुक्तीचा अधिकार बालकाला आहे.

### शिक्षक किंवा बालसंगोपन संस्थेतील (CCI) काळजी पुरवणाऱ्याने विद्यार्थ्याला/ बालकाला (केअरगिव्हर) कानाखाली मारल्यास कोणत्या कायद्यांचे उल्लंघन होते ?

खालील कायदे आणि घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन होते:

- **मोफत व सक्तीच्या शिकणाचा हक्क कायदा, २००९** – कलम १७: शाळांमध्ये शारीरिक शिक्षा व मानसिक छळ करण्यास मनाई.
- **बाल न्याय कायदा, २०१५** – कलम ७५: पालक किंवा संस्था प्रमुखाने बालकांवर केलेल्या क्रूरतेस शिक्षा.
- **बाल न्याय कायदा कलम ८२:** CCI मध्ये शारीरिक शिक्षा करण्यास मनाई.
- **भारतीय न्याय संहिता:** शारीरिक हल्ल्याशी संबंधित तरतुदी.
- **भारतीय संविधान** – कलम २१ आणि ३९(e)(f): जगण्याचा, सन्मानाचा व शोषणापासून संरक्षणाचा हक्क.

### शिक्षक किंवा CCI मधील कर्मचाऱ्याने/ काळजी पुरवणाऱ्याने (केअरगिव्हर) बालकाला मारल्यास संस्थेने कोणती कारवाई करावी ?

खालील संरक्षणात्मक व सुधारात्मक उपाय कराव्यात :

- बालकाच्या सुरक्षेची खात्री करावी.
- आरोपी शिक्षक/केअरगिव्हरला चौकशीदरम्यान विद्यार्थ्यांपासून दूर ठेवावे.
- घटनेबाबत शाळा व्यवस्थापन समिती (SMC), बालकल्याण समिती (CWC) किंवा जिल्हा बाल संरक्षण युनिट (DCPU) ला माहिती द्यावी.
- मानसिक व भावनिक आधार द्यावा.
- घटनेची व झालेल्या कृतींची लेखी नोंद ठेवावी.
- शिक्षक व कर्मचाऱ्यांना सकारात्मक शिस्तीबाबत प्रशिक्षण द्यावे.

## वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ)

### अशा प्रकरणांमध्ये NGOs ची भूमिका काय असते?

- NGOs बालकांचे संरक्षण व जबाबदारी निश्चित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात:
- बालकाला व कुटुंबाला कायदेशीर मदत मिळवून देणे.
- CWC किंवा SCPCR कडे प्रकरण नोंदवणे.
- संस्थेने केलेल्या कारवाईवर देखरेख.
- शाळांमध्ये बाल संरक्षण धोरणे राबवण्यासाठी पाठपुरावा करणे.
- शिक्षकांसाठी कायदेशीर व सकारात्मक शिस्त प्रशिक्षण देणे.

### जर CCI ने एखाद्या मुलाला खोलीत बंद केले, तर कोणत्या कायद्यांचे उल्लंघन होते?

खालील कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन होते:

- बाल न्याय कायदा २०१५ – कलम ७५ : CCI मधील क्रूरतेस शिक्षा.
- कलम 82: ज्या वेळी एखाद्या मुलाला बंद खोलीत ठेवून त्याला शारीरिक किंवा मानसिक इजा होईल अशी वागणूक दिली जाते तेव्हा ते शिक्षा म्हणून दिलेलं वागणं समजलं जातं आणि ते गुन्हा आहे.
- JJ नियमावली २०१६ – नियम ८९ :
  - मुलांना एकटं बंद खोलीत ठेवण्यास बंदी आहे.
  - **CCI मार्फत** शिस्तीसाठी बाल प्रेमी, सकारात्मक पद्धती वापरणे बंधनकारक आहे.
  - सुधारात्मक उपाययोजना प्राधान्य देणे गरजेचे आहे.

### अशा घटनेची माहिती कशी द्यावी?

- तातडीने व औपचारिकपणे खालील कृती कराव्यात:
- संस्थेच्या प्रमुख व नामनिर्दिष्ट बाल संरक्षण अधिकाऱ्यास कळवावे.
- खालील बाल संरक्षण प्रणालीतील महत्वाच्या संस्थांना माहिती द्यावी.
  - o बालकल्याण समिती (CWC)
  - o जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU)
- जर शारीरिक इजा किंवा धोका असेल, तर:
  - o विशेष बाल पोलीस कक्ष (SJPU) किंवा स्थानिक पोलीसांना कळवावे.
- घटनेची, कारवाईची व प्रतिसादांची सविस्तर नोंद ठेवावी.
- तातडीच्या किंवा अत्यावश्यक प्रकरणांमध्ये 1098 – चाईल्डलाईन वर कॉल करून मदत मागावी.

## वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ)

### जर तुम्ही शारीरिक शिक्षेचा साक्षीदार असाल तर काय करावे?

**तत्काळ सुरक्षिततेची खात्री करा – मुलाला शारीरिक धोक्याचा संभाव आहे का?**

**होय –**
हस्तक्षेप करा – शांतपणे पुढे या आणि संबंधित व्यक्तींना वेगळं करा.

**नाही –**
परिस्थिती शांतपणे निवळवा.

**निरीक्षण करा आणि नोंद ठेवा**
नोंद घ्या: तारीख, वेळ, ठिकाण
नोंदवा: कोण, काय, कसे

**आतील अहवाल द्या**
पर्यवेक्षक किंवा नेमलेल्या बाल संरक्षण अधिकाऱ्याला सूचित करा.

**बाह्य अहवाल (आवश्यक असल्यास)**
बाल कल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण विभाग (DCPU), विशेष बाल संरक्षण विभाग (SJPU) / स्थानिक पोलीस (जर हानी झाली असेल तर)

**साहाय्य प्रदान करा किंवा व्यवस्था करा**
वैद्यकीय उपचार, मानसिक आरोग्य सेवा, समुपदेशन, स्वयंसेवी संस्थेकडे पाठविणे इत्यादी.

**अनुयोजन व निरीक्षण करा**
बालकाच्या कल्याण नियमितपणे तपासा. घेतलेल्या दुरुस्ती उपाययोजनांचा आढावा घ्या.

---

**हा दस्तऐवज अद्याप तयार होत आहे.**
**तुमच्याकडे काही सूचना किंवा प्रतिक्रिया असल्यास, कृपया आम्हाला खालील ई-मेलवर संपर्क करा:** ***contactprerana@gmail.com***

दस्तऐवज तयार केला - **पूजा यादव आणि रश्मी टेलर**
सहाय्य आणि योगदान - **प्रीती पाटकर**
डिझाईन - **रश्मी टेलर**
प्रूफरीडिं - **छाया जगताप**
दस्तऐवज तयार करण्याची तारीख - **मे २०२५**

Prerana- 414, Bhaveshwar Arcade Annexe,
Opp. Shreyas Cinema, LBS Road, Ghatkopar West, Mumbai- 400 086

preranaantitrafficking.org
fighttrafficking.org